विशेषता

प्राणी आणि माणूस यात मुख्य भेद प्रकृतीने केला तो जिभेचा, प्राणिमात्र सर्व नियम अगदी नैसर्गिकरित्या सहज वृत्तीने पाळताना दिसतात.

माणूस मात्र नियमांचे उल्लंघन करण्यात पुढे, जिभेच्या बाबतीत तर संयम असणारा तो किंवा ती विरळाच.

जिभेवरील ताबा खाण्याच्या बाबतीत गेला की नको नको त्या गोष्टी जवळ होतात, जसें वजनवाढ, असाध्य रोग, स्थूलता इत्यादी आणि जिभेवरील ताबा बोलण्याच्या बाबतीत गेला की भले भले लोक, मित्र, नाती अगदी लांब जातात...

जिभेवर ताबा मिळवणें म्हणण्यापेक्षा तिलाच आपल्या ताब्यात ठेवणे हे ज्यांना जमले ते या जीवनात निश्चितच विजेते म्हणले पाहिजेत, अशी व्यक्ती विरळाच...

© सपु
www.saarthbodh.com

- सचिन कुलकर्णी